**“सौर ऊर्जीकरण करण्यासाठी वीज वितरण प्रणाली बळकट करणे व शेतकऱ्यांच्या कृषीपंपास पारंपरिक पध्दतीने वीज जोडणी देणे”या योजनेस शासनाकडून रु. १७०.०० कोटी इतका निधी भागभांडवल उपलब्ध स्वरूपात करुन देणेबाबत. (लेखाशिर्ष क्र. ४८०१४०९५)**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ADB-२०२६ /प्र.क्र.२६७/ऊर्जा-५**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०१ जुलै, २०२६.

**वाचा:-**

१. शासन निर्णय क्रमांक: सौरप्र-२०१५/प्र. क्र.३५४/ऊर्जा-७, दि.१४ जून,२०१७.
२. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२०/प्र. क्र. १२१/ऊर्जा-५, दि.१८ डिसेंबर, २०२०
३. शासन निर्णय क्रमांक: सौरप्र-२०२३/प्र.क्र.९५/ऊर्जा-७, दि.०८ मे, २०२३
४. शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२३ /प्र.क्र.४५६/ऊर्जा-५, दि. १५ मार्च, २०२४
५. शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२३ /प्र.क्र.४५६/ऊर्जा-५, दि. ३१ मार्च, २०२६
६. वित्त विभागाचा परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६
७. महावितरण कं. पत्र क्र. संचालक/प्रकल्प/१४८४२ दि. ०४ मे, २०२६

**प्रस्तावना :-**

“मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY-२.०)” या राज्यशासनाच्या flagship योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी “सौर ऊर्जीकरण करण्यासाठी वीज वितरण प्रणाली बळकट करणे व शेतकऱ्यांच्या कृषीपंपास पारंपारीक पध्दतीने वीज जोडणी देणे” या योजनेस व त्याकरिता Asian Development Bank (ADB) कडून कर्ज घेण्यास शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजना महावितरण कंपनी मार्फत राबवण्याकरीता सौर ऊर्जा निर्मितीच्या प्रकल्प किमतीच्या ३०% Viablity Gap Funding (VGF) (व्यवहार्य फरक निधी) रुपये २२०० कोटी, वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करण्याकरीता रुपये ७६०० कोटी, शेती पंपांना पारंपारिक पद्धतीने वीज जोडणी करण्याकरीता रुपये १००० कोटी, SCADA प्रणाली करिता रुपये ६०० कोटी, प्रायोगिक तत्त्वावर बॅटरी एनर्जी स्टोरेज करण्याकरीता रुपये १५० कोटी व प्रकल्प राबवण्याकरीता सहाय्य (Project Implementation Assistance) रुपये ३५ कोटी अशा विविध घटकांच्या कामानुसार एकूण रू.११५८५ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या एकूण रकमेपैकी ७०% नुसार रू.८१०९ कोटी इतका निधी “Market Borrowing” व्दारे Asian Development Bank (ADB) यांच्याकडून प्रचलित बाजार भावाच्या व्याज दराने राज्यशासनाने कर्ज घेऊन महावितरण कंपनीस देण्यास व योजनेचा ३०% निधी रु. ३४७६ कोटी सन २०२४-२८ या वर्षात राज्य शासनाच्या अर्थसंकल्पिय नियतव्ययातून महावितरण कंपनीस भागभांडवल स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ मध्ये रू. ४२५.०० कोटी इतका निधी लेखाशिर्ष क्र. ४८०१४०९५ अंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाचा शासन निर्णय दि. ०९.०४.२०२६ अन्वये सन २०२६-२७ च्या प्रथम नऊमाही करिता (डिसेंबर २०२६ अखेर) एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे. यानुसार वित्त विभागाने अर्थसंकल्पित निधीपैकी ४० टक्के म्हणजेच रु. १७०.०० कोटी इतका निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

"सौर ऊर्जीकरण करण्यासाठी वीज वितरण प्रणाली बळकट करणे व शेतकऱ्यांच्या कृषीपंपास पारंपारीक पध्दतीने वीज जोडणी देणे" या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीस रु. १७०.०० कोटी रक्कम भागभांडवल स्वरूपात लेखाशिर्ष ४८०१४०९५ अंतर्गत वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

१. "सौर ऊर्जीकरण करण्यासाठी वीज वितरण प्रणाली बळकट करणे व शेतकऱ्यांच्या कृषीपंपास पारंपारीक पध्दतीने वीज जोडणी देणे" या योजनेअंतर्गत राज्य शासनाची सन २०२६-२७ करीताची भांडवली गुंतवणूक म्हणून रुपये १७०,००,००,०००/- (रुपये एकशे सत्तर कोटी फक्त) इतका निधी महावितरण कंपनीस वितरित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली भागभांडवलाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा महावितरण कंपनीने करावी.

३. वरील बाबींचा खर्च "मागणी क्र. के-११ मुख्यलेखाशिर्ष ४८०१ पारेषण व वितरण ०५ सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०१) भांडवली गुंतवणुक (०१) (०१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये भांडवली गुंतवणुक (कार्यक्रम) ५४ गुंतवणूका (४८०१४०९५)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्यामार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीमती अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३) आणि नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. नारायण कराड, सह सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी सदर मंजूर झालेली रक्कम रुपये १७०,००,००,०००/- (रुपये एकशे सत्तर कोटी फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (खाते क्र.६०३५५७५६२६१) येथून आहरित करुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचे नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित अथवा NEFT/RTGS Fund Transfer द्वारे हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी.

५. या लेखाशिर्षांतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर देयक हे बिनशर्त असून, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२६५/२०२६/व्यय-१६, दि.१६.०६.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०७०११६२६०८४३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2026.07.01 16:27:48 +05'30'

**( सुर्यकांत निकम )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवा कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (अपारंपारीक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई-३२.
९. सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
१०.मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११.अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२.
१२.अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४.प्रधान सचिव (नियोजन ) मंत्रालय, मुंबई-३२.
१५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१६.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
१८. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
१९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
२१.कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२२.कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३.कार्यासन अधिकारी (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
२४.कार्यासन अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२५.निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२६.ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.